**महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ**
मध्यवर्ती कार्यालय, महाराष्ट्र वाहतूक भवन, डॉ.आनंदराव नायर मार्ग, मुंबई-४०० ००८.
दुरध्वनी क. २३०२ ३९०० Website: www.msrtc.gov.in फॅक्स क.०२२ २३०७ १३७६

क्र.राप/वाह/सवलत/ १२७३
परिपत्रक क्र. ०४/२०१९

दिनांक : ०५/०३/२०१९

**प्रति.**

**उपमहाव्यवस्थापक (नियंत्रण समिती क्र. १/ २/ ३)**

**विभाग नियंत्रक, रा.प.** मुंबई/ पालघर/ रायगड(पेण)/ रत्नागिरी/ सिंधुदूर्ग/ ठाणे/ नाशिक/ धुळे/ जळगांव/ अहमदनगर/ पुणे/ कोल्हापूर/ सांगली/ सातारा/ सोलापूर/ औरंगाबाद/ बीड/ जालना/ लातूर/ नांदेड/ उस्मानाबाद/ परभणी/ नागपूर/ भंडारा/चंद्रपूर/वर्धा/गडचिरोली/अकोला/अमरावती/यवतमाळ/ बुलडाणा विभाग.

**विषय:-** रा.प.महामंडळाच्या शिवशाही (आसनी) बसेसमध्ये दिव्यांग (अंध/अपंग )तसेच त्यांचे साथीदार यांना सवलत देणेबाबत.

संदर्भ :-१.शासननिर्णय क्र.एसटीसी १९८१/४४२-परि -१ दि.१३.०५.१९८५.
२.शासननिर्णय क्र.एसटीसी ०६०८/प्र.क्र.३२४/ परि -१ दि. २६.११.२००८.
३.शासननिर्णय क्र.एसटीसी १०१७/प्र.क्र.५२५/ परि -१ दि. ०९.१०.२०१८.
४.या कार्यालयाचे परिपत्रक क्र.३६/२०१८, क्र.राप/वाह/सवलत/अंध-अपंग/४७३०, दि.१२.१०.२०१८.

-----

शासन निर्णय क्र.टीसी १९८१/४४२-परि-१, दिनांक १३.०५.१९८५ अन्वये महाराष्ट्र राज्यातील अंध/अपंग व्यक्तींना तसेच त्यांचे साथीदारांस रा.प. साध्या बसेसमध्ये प्रवासभाडयात अनुक्रमे ७५% व ५०% सवलत अनुज्ञेय करण्यात आली असून, शासन निर्णय क्र.एसटीसी ०६०८/प्र.क्र.३२४/परि-१,दिनांक २६.११.२००८ अन्वये रा.प.महामंडळाच्या साध्या बसेसमधुन देण्यात येणारी सदर सवलत निमआराम बसेसमध्ये देखील लागू करण्यात आली आहे. त्यानुसार अंध/ अपंग व्यक्तींकडून तसेच त्यांचे साथीदार यांचेकडून प्रवासभाडयातील अनुक्रमे २५% तसेच ५०% रक्कम वसूल करण्यात येते व उर्वरीत अनुक्रमे ७५% व ५०% रकमेची प्रतिपूर्ती शासनाकडुन करण्यात येत आहे.

या कार्यालयाचे परिपत्रक क्र.३६/२०१८, क्र. राप /वाह/सवलत/अंध-अपंग/४७३०, दि.१२.१०.२०१८ अन्वये ६५% किंवा अधिक अपंगत्व असलेल्या लाभार्थ्यांच्या साथीदारास प्रवासभाडयात ५०% सवलत अनुज्ञेय करण्यात आली आहे.

..२..

रा.प. महामंडळाने शिवशाही बस सेवा सुरु केलेली आहे. यामध्ये अंध/अपंग व्यक्तींना तसेच त्यांचे साथीदारांस एस टी प्रवासभाडयात सवलत अनुज्ञेय नव्हती. अंध/अपंग व्यक्तींना तसेच त्यांचे साथीदारांस शिवशाही (आसनी) बसेसमध्ये अनुक्रमे ७०% व ४५% सवलत अनुज्ञेय करण्याबाबत सक्षम प्राधिकारी यांनी निर्देश दिलेले आहेत.

सद्यस्थितीत अंध/अपंग व्यक्तींना तसेच त्यांचे साथीदारांस रा.प. महामंडळाच्या साध्या व निमआराम बसेसमधुन देण्यात येणारी अनुक्रमे ७५% व ५०% प्रवासभाडे सवलत आता शिवशाही (आसनी) बसेसमध्ये अनुक्रमे ७०% व ४५% सवलत अनुज्ञेय करण्यात येत असून उर्वरित ३०% व ५५% प्रवासभाडे रक्कम ही अंध/अपंग व्यक्तीं तसेच त्यांचे साथीदार प्रवाशाकडून वसुल करण्यात येईल. अंध/अपंग व्यक्तींना तसेच त्यांचे साथीदारांस देण्यात येणा-या सवलतीच्या रकमेची प्रतिपुर्ती शासनाकडुन रा.प. महामंडळास करण्यात येईल.

<u>प्रस्तुत सवलत दिनांक ०७.०३.२०१९ (दि.०६.०३.२०१९ व दि.०७.०३.२०१९ ची मध्यरात्र) पासून अंमलात येईल.</u>

१. ज्या अंध/अपंग व्यक्तींनी तसेच त्यांचे साथीदार यांनी दि.०७.०३.२०१९पूर्वी शिवशाही (आसनी) बससेवेचे आगाऊ आरक्षण तिकिटे (Advanced Booking) घेतलेले आहे, अशा अंध/अपंग व्यक्तींना तसेच त्यांचे साथीदारांस शिवशाही आसनी बसेसकरिता अनुक्रमे ७०% व ४५ % सवलतीचा परतावा देऊन सदर परतावा दिलेल्या रकमेची मागणी मासिक विवरणपत्रात समायोजीत करण्यासाठी दर्शवावे. तसेच सदर परतावा देण्याचे अधिकार स्थानक प्रमुख या स्तरावरच राहतील.

२. स्थानक प्रमुख व्यक्तीशः अंध/अपंग व्यक्तींनी पुरावे म्हणुन सादर केलेले प्रमाणपत्र यांची तपासणी करुन त्याचा तपशील कर्तव्यावर वाहकांच्या मार्गपत्रक संक्षेपाच्या मागे नोंदवुन त्यावर स्वाक्षरी करुन परताव्याची रक्कम प्रमाणीत करतील.

३. ज्याठिकाणी स्थानकप्रमुख नियुक्त नसतील अशा ठिकाणी मार्गावरील कोणत्याही स्थानकावर, प्रवास संपणा-या ठिकाणी नियुक्त असलेल्या स्थानक प्रमुखाकडुन परतावा प्रमाणीत, पडताळणी करण्यात यावी.

४. स्थानकप्रमुख प्रवास मार्गाच्या सुरुवातीपासुन प्रवास संपेपर्यंत कोणत्याही ठिकाणी नियुक्त नसतील अशा ठिकाणी अपवादात्मक परिस्थितीत रकमेचा परतावा रा.प. वाहकांनी दयावयाचा आहे.

विभाग नियंत्रकांनी विभागीय वाहतूक अधिकारी, विभागीय लेखाधिकारी, आगार व्यवस्थापक, आगार लेखाकार, स्थानक प्रमुख यांच्या बैठका आयोजीत करुन सदर सवलतीबाबत सविस्तर सुचना द्याव्यात. आगार व्यवस्थापकांनी प्रस्तुत सवलतीची माहिती सर्व पर्यवेक्षकीय कर्मचारी व चालक / वाहक यांना व्हावी या हेतुने कर्मचारी सुचना फलक, रोकड व तिकिट विभाग, स्थानक प्रमुख कार्यालय, प्रवासी सुचना फलक इ. ठिकाणी सदर सवलती बाबतची माहिती वाचनीय व दर्शनीय स्वरुपात प्रसिद्ध करण्यात यावी व वर्तमान पत्रातून सदर सवलतीस प्रसिद्धी देण्यात यावी.

सदर सवलतीबाबत लेखांकन करण्याच्या सुचना लेखा खात्याकडून स्वतंत्रपणे निर्गमित करण्यात येतील.

महाव्यवस्थापक (वाहतूक)

प्रत रवाना:

- मा.अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ यांचे स्वीय सहाय्यक, / मा.उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ यांचे स्वीय सहाय्यक/ मुख्य सुरक्षा व दक्षता अधिकारी / महाव्यवस्थापक (कं.व.औ.सं.)/ महाव्यवस्थापक (यं.अ.)/ महाव्यवस्थापक (नियोजन व पणन)/ महाव्यवस्थापक (स्थापत्य)/ महाव्यवस्थापक (भांडार व खरेदी)/ उपमहाव्यवस्थापक (माहिती व तंत्रज्ञान)/मुख्य सांखिकी अधिकारी/मुख्य विधी अधिकारी.
- वित्तीय सल्लागार व मुख्य लेखाधिकारी, यांस माहिती व पुढील कार्यवाही करिता. सदर सवलतीबाबत लेखांकन करण्याच्या सुचना आपल्या खात्याकडून स्वतंत्रपणे निर्गमित करण्यात याव्यात,ही विनंती.
- उपमहाव्यवस्थापक (प्रशिक्षण), रा.प. मध्यवर्ती प्रशिक्षण संस्था, भोसरी, पुणे.
- सचिव, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ
- कार्यशाळा व्यवस्थापक, राज्य परिवहन कार्यशाळा, पुणे/ नागपुर/ औरंगाबाद.
- जनसंपर्क अधिकारी यांना उचित कार्यवाहीकरिता. वर्तमान पत्रातून सदर सवलतीस प्रसिद्धी देण्यात यावी.

महाव्यवस्थापक (वाहतूक)